

# नद्यांच्या संवर्धनासाठी विद्यार्थ्यांची जनजागृती फेरी

**बालदिनानिमित्त टाटा** पॉवरच्या क्लब एनर्जी आणि भांडुप, चांदिवली येथील पवार पब्लिक स्कूल यांच्या संयुक्त विद्यमाने नद्यांचे संवर्धन हा विषय घेऊन जनजागृती फेरीचे आयोजन केले होते. नद्या आणि अन्य जलस्त्रोतांचे संवर्धन करण्यासाठी प्रत्येकाने पुढाकार घेणे गरजेचे आहे, हा संदेश देत जवळपास २५० पेक्षा जास्त विद्यार्थ्यी आणि शिक्षक याफेरीत सहभागी झाले होते. ग्रामध्ये नद्यांच्या संवर्धनाचे संदेश देणारे फलक, पोस्टर्सपासूनची तयारी करण्यामध्ये विद्यार्थी मोठ्या उत्साहाने सहभागी झाले होते. यावेळी पाणी प्रदूषित होऊ नये याची काळजी घेणे अत्यंत आवश्यक आहे, हा संदेश देणारे पथनाट्य ही विद्यार्थ्यांनी सादर केले. 'टाटा पॉवरच्या क्लब एनर्जी या राष्ट्रीय चळवळीने गेल्या दहा वर्षात व्यापक स्वरूप प्राप्त केले आहे. निसर्गाचे आणि संसाधनांचे संवर्धन करण्यासाठी असंख्य विद्यार्थी मोठ्या उत्साहाने या सहभागी होत आहेत, हे प्रेरणादायी आहे, अशी प्रतिक्रिया टाटा पॉवरचे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल सरदाना यांनी व्यक्त केली.